# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ च महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभाग


एम. आय. डी. सी. कॉम्पलेक्स रोड, गडचिरोली – ४४२६०५ (महाराष्ट्र)

दूरध्वनी क्र. ०७१३२–२२३१२० भ्रमणध्वनी क्र.९८२२४६९६०९ email:-diilgug@gmail.com, udmanish@gmail.com


पत्र क्र. गोवि./न.न.व.सा.वि/३४४/२०१९ दिनांक: २९.०८.२०१९

प्रती,

मा. प्राचार्य,
संलग्नित महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:– **२०१९ च्या विद्यार्थी सौर उर्जा राजदुत कार्यशाळेबाबत.**

संदर्भ:– **श्री सौरब कटारिया, सहाय्यक प्रकल्प प्रबंधक, आय. आय. टी. बॉम्बे, पवई, मुंबई यांच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या मेल.**

*महोदय,*

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये सादर करण्यात येते की, उन्नत भारत अभियाना अंतर्गत २०१९ च्या विद्यार्थी सौर उर्जा राजदुता कार्यशाळेचे आय. आय. टी. बॉम्बे येथे १५० वी महात्मा गांधीजीची जन्मतिथी प्रित्यर्थ दिनांक ०२ आक्टोंबर, २०१९ रोजी आयोजीत केलेली आहे. सदर कार्यशाळेचे उद्दिष्ट सौर उर्जेप्रती विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व संवेदशिलता निर्माण करणे असुन कार्यशाळे दरम्यान विद्यार्थ्यांना स्वत:चा सौर उर्जा दिवा तयार करण्यासंबंधी प्रशिक्षण देण्यात येणार.

या अनुषंगाने दिनांक ०२ आक्टोंबर, २०१९ रोजी आयोजित १ दिवसीय जागतिक कार्यशाळा आपल्या महाविद्यालयामध्ये घेण्या करीता नोंदणी करण्यासाठी खाली दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करावयाची आहे.

१) महाविद्यालयाला www.ggsy.in/collaborate.php या संकेतस्थळावर नोंदणी करावयाची आहे.

२) सहभागी विद्यार्थ्यांचे वय किमान १० वर्ष असणे आवश्यक असुन कमाल ५० विद्यार्थी सदर कार्यशाळेमध्ये सहभागी होवु शकतील.

३) सदर कार्यशाळे करीता महाविद्यालयाला शिर्ष प्रशिक्षकाची ओळख करून सौर उर्जा दिवा संच विकत घ्यावे लागतील.

४) ओळख केलेल्या शिर्ष प्रशिक्षकांना आय. आय. टी. मुंबई तर्फे ऑनलाईन प्रशिक्षित केले जाणार. दर २५ विद्यार्थ्यांमागे १ शिक्षकाला शिर्ष प्रशिक्षक करणे आवश्यक असणार.

५) महाविद्यालयाला सौर उर्जा दिवा संच विकत घ्यावे लागतील. सदर संचाची कर व वाहतुकीसहीत किंमत रूपये ४९५ ते ५३० असणार. सदर संकेतस्थळावर पुरवठादारांची यादी पुरविण्यात आलेली आहे.

६) सर्व सहभागी विद्यार्थी व प्रशिक्षकांना १० रूपयांचे देयकानंतर ई प्रमाणपत्र देण्यात येईल.

७) संपर्क workshop.associates@ggsy.in or call 91222576895

तरी आपल्या संलग्नित महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सदर २०१९ च्या विद्यार्थी सौर उर्जेच्या राजदुताच्या कार्यशाळे मध्ये सहभागी होण्याकरीता दिनांक ३ सप्टेंबर पर्यन्त नोंदणी करण्यास संदर्भित पत्रान्वये आंमत्रित करण्यात येत आहे. करीता याची सर्व प्राचार्य, संलग्नित महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

धन्यवाद!

संचालक
नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य

**प्रा. मनिष द. उत्तरवार**
**संचालक**
**नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली-४४२६०५**